# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - २०

## (सभावृत्तांत)

दिनांक–०२/०८/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०२/०८/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.उत्तम प्रकाश केंदळे
४) मा.मुंढे उषा अंकुश
५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
७) मा.कुटे निर्मला संजय
८) मा.कोमल दिपक मेवानी
९) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१३) मा.राजू मिसाळ
१४) मा.अमित राजेंद्र गावडे
१५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.गावडे-सहआयुक्त,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत-सहाय्यक आयुक्त,मा.साळुंके -मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,मा.आवारी-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.निकम,मा.सवणे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.घुबे,मा.थोरात,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे मा.रत्नपारखी,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.गायकवाड,मा.भोसले, मा.मोरे,मा.पाटील-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.बहुरे-प्रशासन अधिकारी, मा.लावंड-कायदा अधिकारी,मा.जगदाळे-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(मा.स्थायी समितीतील सन्मा.नगरसदस्या उषा अंकुश मुंढे यांची पिंपरी चिंचवड महापालिकेच्या जैवविविधता व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील कु.शितल जाधव या विद्यार्थीनीने लॉन टेनिस या क्रिडाप्रकारात चौदा वर्षाखालील वयोगटात प्रथम क्रमांक आणि सोळा वर्षाखालील वयोगटात दुसरा क्रमांक पटकवला त्याबद्दल मा.सभापती यांचे हस्ते सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.)

----------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक ३७) मनपाचे नविन ग व ह प्रभाग क्षेत्रिय कार्यालयास आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक ३८) संभाजीनगरमधील शिव शाहू शंभो उद्यान देखभाल,विकास व संरक्षणाकामी देणेबाबत – मा.अमित गावडे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९) शाहूनगरमधील शाहू उद्यान देखभाल,विकास व संरक्षणाकामी देणेबाबत – मा.हर्षल ढोरे, मा.मोरेश्वर भोंडवे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०) क्रांतिवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणेसाठी वास्तुविशारद नेमणेबाबत – मा.उषा मुंढे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१) क प्रभागातील विविध कामांकरिता आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट इ.ची नेमणूक करणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे,मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४२) स्थापत्य उद्यान विभागाकडील तरतूद करुन निविदा काढावयाची कामे करणेबाबत – मा.माधुरी कुलकर्णी, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४३) महानगरपालिका क्षेत्रातील विविध कामांकरिता आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट इ.ची नेमणूक करणेबाबत-मा.आशा धायगुडे-शेंडगे,मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४४) मा.स्थायी समिती सभा दि.१०/८/२०१७ रोजी दु.२.०० वा. घेणेबाबत – मा.वैशाली काळभोर, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

-----------

दिनांक १९/०७/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १८) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

**निर्णय–१) <u>शहरातील रस्त्यांवरील खड्डयांबाबत</u>** – शहरातील सर्व खड्डे ताबडतोब भरले गेले पाहीजेत.

**२) <u>मोकाट जनावरे, डुकरांबाबत</u>** –

**अ)** सभेमध्ये सर्व सदस्यांनी शहरातील मोकाट जनावरे, कुत्री, डुकरे यांच्याबाबत तक्रारी मांडल्या आहेत, सूचना केल्या आहेत. शहरातील आतील भागांत सर्रास मोकाट जनावरे, डुकरे रस्त्यात आडवे येत असतात,रस्त्याच्या मधोमध बसलेले असतात. शहरात डुकरांची संख्या

खूप वाढली आहे. भटकी,मोकाट जनावरे पक्रडणे, जनावरांची मोजणी करणे, यासाठी जी एजन्सी नेमली आहे,त्यांच्या कामकाजाचे नियोजन करावे.

**ब)** किती डुकरे पकडली, याची माहिती विभागाला देखील असणे आवश्यक आहे. निविदाधारकास फायदा होत असेलतरच तो तेवढी तत्परता दाखवणार. टेंडर करताना सर्व बारीकसारीक मुद्यांचा देखील विचार झाला पाहीजे.

**क)** पावसाळ्यात साप निघण्याचे प्रमाण जास्त असते. एका घरात ४६ साप निघाल्याची बातमी वर्तमानपत्रात आली होती. अशावेळी महापालिकेची यंत्रणा काय काम करते. नागरीकांच्या जीवीताचा प्रश्न निर्माण होतो, अशा ठिकाणी महापालिकेने हयगय करणे अपेक्षित नाही. स्थायी समितीचे आदेश आहेत की, यापूर्वी जे सर्पमित्र मानधनावर काम करीत होते त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे.

**३) <u>अनधिकृत फलकांबाबत-</u>**

**अ)** अनधिकृत फलकांवर जाहीरात दिसल्यास जाहीरातीच्या दरापेक्षा शंभर पटीने दंड आकारण्यात यावा. कडक कारवाई करावी.

**ब)** ज्या-ज्या ठिकाणी अनधिकृत इमारतींवर फलक लागलेला आहे, त्या सर्व जागा/इमारत मालकांना नोटीस बजवावी की, ते फलक स्वखर्चाने काढून टाकावेत. महापालिकेने बोर्ड काढल्यास त्याचा खर्च संबंधित मालकाला द्यावा लागेल.

**क)** महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीबाहेरील, कासारवाडी चौकातील, जे बोर्ड मोठ्या स्वरुपात दिसतात ते पहिले काढण्यात यावेत. कासारवाडी येथे लावलेल्या फलकामुळे जे आर डी टाटा उड्डाण पूल झाकलेला आहे. अशावेळी संबंधित फलकधारकास सांगूनही जर तो फलकाची साईज कमी करत नसेल तर महापालिकेने फलक कापण्याची कारवाई करावी. उद्यापासून आठ प्रभागांत आठ ठिकाणी बोर्डांवर कारवाई झाली पाहीजे.

**ड)** नोटीस पिरीयड संपूनही अजून कोणी कागदपत्रे आणून दिलेली नाहीत त्यामुळे कारवाईस सुरुवात करावी. पुढील ८ दिवसांत शहरातील किमान पन्नास ते शंभर बोर्ड उतरले पाहीजेत. कटींग चार्जेस असतील त्याचा भार त्या एजन्सीवर ठेवण्यात यावा.

**इ)** अनधिकृत फलकांना प्रति बोर्ड, प्रति महिना रु.१०,०००/- इतका दंड आकारण्यात यावा व ठेकेदाराकडून तो वसूल करावा. बोर्ड कधी लावला आहे हे गृहीत धरु नका. दंड वसूल झाला नाहीतर फौजदारी दाखल करा, बोर्ड काढून टाका. परवानगी असलेल्या बोर्डस् वर त्या ठेकेदाराला जाहीरात करु देऊ नका. सगळ्या ठेकेदारांची सगळ्या प्रकारे मुस्कटदाबी करा.

**ई)** पुणे-मुंबई हाय-वे वरील बोर्डस् तपासले, त्याप्रमाणे इतर सर्व हाय-वे, रस्त्यांवरील बोर्डस् ची तपासणी करावी. ज्या ठिकाणी अनधिकृत बोर्ड सापडतील, तिथे कारवाई करावी.

**उ)** दंड वसूल झाला पाहीजे. आपल्याला ठेकेदाराचे नाहीतर, महापालिकेचे उत्पन्न वाढवायचे आहे. किती दंड वसूल झाला, विभागप्रमुखांनी याची माहिती पुढील बुधवारी स्थायी समिती सभेमध्ये द्यावी.

**ऊ)** सन्मा.सदस्यांनी जे-जे प्रश्न केले आहेत, विभागप्रमुखांनी पुढील बुधवारी होणा-या सभेमध्ये याची सविस्तर माहिती देण्यात यावी. किऑस्क संदर्भात टेंडरींग प्रक्रिया झालेली असली पाहीजे.

**४) <u>बीआरटीएस मार्गावरील पोलबाबत</u>** -

पुणे-मुंबई महामार्गावर बीव्हीजी कंपनीला कोणत्या कामासंदर्भात परवानगी दिली आहे, कुठे-कुठे पोल लावले आहेत, त्यांनी बीआरटीएस मार्गावर जे बसस्टॉप उभारले होते त्यातील दोन बसस्टॉप पडले आहेत, या कंपनीकडून त्याचा खर्च वसूल करुन घेतलात का, इ. बाबत या संपूर्ण विषयाची सविस्तर माहिती मा.जुंधारे, कार्यकारी अभियंता यांनी पुढील बुधवारी होणा-या सभेमध्ये देण्यात यावी.

**५) <u>अंडरपासमधील व्यवस्थेबाबत</u>**- फुगेवाडी येथील अंडरपास, काळेवाडी येथील अंडरपास, बिगबाजारसमोरील अंडरपास याठिकाणी असलेली स्वच्छता, प्रकाशव्यवस्था उद्या याची पाहणी स्थायी समितीकडून केली जाईल. परंतू तिथे जर काही त्रुटी आढळल्यास त्यास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

**६) <u>१०वी व १२वी तील उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांना फॉर्म देणेबाबत</u>** –

शाळांच्या बाबतीत कुठलीही हयगय किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. फाईलवर मा.आयुक्त यांची सही घेऊन उद्या कुठल्याही परिस्थितीत हा विषय पूर्ण करावा. सर्व नगरसदस्यांना दोन दिवसांत फॉर्म वितरीत व्हावेत.

**७) <u>आधारकार्डबाबत-</u>**नागरीकांना, ५ वर्षांखालील मुलांना सुद्धा पैसे आकारले जात आहेत. नागरीकांना आधारकार्ड मोफत काढून दिले गेले पाहीजेत. ऑपरेटर उपलब्ध होत नसतीलतर महानगरपालिकेच्या आयटीआयमधील माजी विद्यार्थ्यांना तसे एक दिवसाचे ट्रेनिंग द्यावे. ऑपरेटर उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांना तसा प्रस्ताव द्यावा. दि,९ ऑगस्ट रोजी आठ प्रभागांमध्ये मशिन उपलब्ध करुन देऊन आधारकार्ड केंद्र सुरु करण्याची व्यवस्था करण्यात यावी. दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी कोणत्याही परिस्थितीत झाली पाहीजे. यासाठी नागरीक पैसे मोजणार नाहीत. ही योजना मोफत असल्याने ती मोफतच मिळाली पाहीजे. याची जाहीरात करावी.

या स्थायी समिती सभेमध्ये मा.सभापती यांनी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी त्वरित करणेत यावी.

------------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक –७२१ | विषय क्रमांक – १ |
| दिनांक – ०२/०८/२०१७ | विभाग – लेखा |
| सूचक – मा.लक्ष्मण उंडे | अनुमोदक – मा.उत्तम केंदळे |

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/६५४/२०१७ दि.१३/०७/२०१७

विषय -शालेय पोषण आहार सन २०१६-१७ योजनेअंतर्गत माहे डिसेंबर २०१६ चे बाकी व माहे जानेवारी-१७ ते मार्च २०१७ पर्यंतची १ ली व ५ वी व इ.६ वी ते ८ वी चे इस्कॉन फुड फौंडेशन व इतर पुरवठाधारक यांचे शासकीय अनुदान अदा करणेकामी तरतुद वर्ग करणेकामी नविन लेखाशिर्ष निर्माण करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७२२ विषय क्रमांक – २

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/१२/कावि/१९१/१७ दि.१९/०७/२०१७

विषय - सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन अंदाजपत्रक तरतूद रक्कम वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७२३ विषय क्रमांक – ३

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – जलनि:सारण

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.जनि/२/कावि/२१८/२०१७ दि.२१/७/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलनि:सारण विभागाकडून शौचालय बांधणेबाबत जाहिर प्रकटन प्रसिध्द करणेत आलेली असुन जाहिरात क्र.४३२ पत्र क्र.जनि/२/कावि/८३/२०१३ अन्वये दैनिक/ साप्ताहिक यांना दिनांक ०३/०३/२०१४ रोजी किंवा त्यापुर्वी प्रसिद्ध करणेस देणेत आली होती. त्यांनी प्रस्तावात नमूदप्रमाणे विभागास बीले सादर केलेली आहेत. तथापी प्रस्तुत जाहिरात दै.सकाळ, यांनी दिनांक ०२/०३/१४ रोजीचे अंकात अ.क्र ६४ चौ.से.मी. इतक्या कमीत कमी व्याप्तीमध्ये प्रसिद्ध केली असल्याने जनता संपर्क विभागाकडील परिपत्रक क्र.जस/०६/कावि/६६/२०१४ दि.१४/०२/२०१४ चे परिपत्रकानुसार उर्वरीत वृत्तपत्रांना ६४ चौ.से.मी. व्याप्तीचे प्रस्तावात नमूद प्रमाणे बील दै. सकाळ यांना बि.र.रू.५४,०८०/- (२% आय.टी. कपात र.रू.१,०८२/- वजा जाता एकूण र.रू.५२,९९८/-) यास मान्यता देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७२४ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२१७/२०१७ दि.२४/७/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-2017 मधील अ.क्र.2 अन्वये प्रभाग क्र.23 केशवनगर येथील जुन्या तालेरा रूग्णालयातील विद्युत व्यवस्थेचे नुतनीकरण करणेकामी मे.अवधूत इलेक्ट्रिकल लाईफ अँड सर्व्हिसेस नि.र.रू.7,49,999/- (अक्षरी र.रू.सात लाख एकोणपन्नास हजार नऊशे नव्यान्नव फक्त) पेक्षा 15.51% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –७२५ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२२३/२०१७ दि.२४/७/२०१७
मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-2017 मधील अ.क्र.10 अन्वये मुंबई पुणे रस्त्यावरील दिवाबत्तीच्या विज वितरण प्रणालीत सुधारणा करणेकामी मे.अवधूत इलेक्ट्रिकल लाईफ अँड सर्व्हिसेस नि.र.रू.9,33,090/- (अक्षरी र.रू.नऊ लाख तेहतीस हजार नव्वद फक्त) पेक्षा 10.42% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७२६ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/२२१/२०१७ दि.२४/७/२०१७
मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-2017 मधील अ.क्र.5 अन्वये अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आकुर्डी एमआयडीसी उपविभागामध्ये असणा-या मोरवाडी आयटीआय विद्युतीकरण करणेकामी (सन २०१६-१७) मे.अवधूत इलेक्ट्रिकल लाईफ अँड सर्व्हिसेस नि.र.रू.5,24,996/- (अक्षरी र.रू.पाच लाख चौवीस हजार नऊशे शहान्नव फक्त) पेक्षा 12.97% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७२७ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – जलनिःसारण
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जनि/२/कावि/२१९/१७ दि.२४/७/२०१७
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनि:सारण विभागाकडील नि.नो.क्र.7/5/2016-17 अन्वये रावेत मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र. १८,१९ मधील किवळे, रावेत, वाल्हेकरवाडी येथील नाल्यामधील जलनिःसारण नलिका दुरुस्ती व इतर जलनिःसारण विषयक कामे करणेकामी M/s. YASHAK ASSOCIATES नि.र.रू.67,49,564/- (अक्षरी र.रू.सदुसष्ठ लाख एकोणपन्नास हजार पाचशे चौसष्ठ फक्त) पेक्षा १९.२०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने रकम रूपये 57,26,330/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे

भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७२८ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/७८/२०१७ दि.२४/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलक्षेत्र क्र.ड १,२,३,४ अंतर्गत व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी कर्मचारी पुरविणेचे काम मे.शुभम उद्योग यांना देणेत आले आहे. सदरचे काम निविदा दरापेक्षा 16.42% जादा दराने देणेत आलेले असून सदर कामाची मुळ मुदत 10 महिने होती. सन 2016-17 चे अंदाजपत्रकामध्ये मजुर पुरविणेच्या नवीन कामास पुरेशी तरतूद नसल्यामुळे सदरचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करता आली नाही. जलक्षेत्र क्र.ड १,२,३,४ अंतर्गत व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी कर्मचारी पुरविणे या कामाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम उपलब्ध नाही, त्यामुळे सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देणेकामी किमान 7-8 महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी विषयांकित काम पुढे चालु ठेवणे आवश्यक आहे. सदर कामाची निविदा रक्कम रु.41,72,300/- इतकी असून सदर काम चालु ठेवणेकरिता वाढीव खर्चाची आवश्यकता आहे. सदर कामासाठी सन 2017-18 च्या अंदाजपत्रकातील पान क्र.865, अनु.क्र.81 या नवीन कामाची निविदा प्रक्रीया या विभागामार्फत अद्याप अंतिम न झाल्याने कामाची आवश्यकता व महत्व लक्षात घेवून मे.शुभम उद्योग यांच्याकडून जुने काम पुढे चालु ठेवण्यात यावे. या विभागामार्फत नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत 6 महिने म्हणजेच दि.31/12/2017 पर्यंत मुदतवाढ मिळणेस त्यासाठी येणा-या वाढीव र.रु.29,14,434/- सह सुधारित खर्च रक्कम रू.1,12,59,034/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – मा.सहशहर अभियंता श्री.दूधेकर यांनी मान्य केलेनुसार दि.३१/१०/२०१७ पर्यंत नविन कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन विषय क्र.८,९ आणि १० मंजूर करणेत येत आहे.

ठराव क्रमांक –७२९ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/८०/२०१७ दि.२४/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१५-१६ करिता जलक्षेत्र क्र.९ ते १५ पाण्याच्या टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणेचे काम मे. समीप सर्व्हिसेस यांना निविदा दरापेक्षा 6.60% कमी दराने देणेत आलेले असून सदर कामाची मुळ मुदत 7 महिने होती. सन 2016-17 चे अंदाजपत्रकामध्ये मजुर पुरविणेच्या नवीन कामास पुरेशी तरतूद नसल्यामुळे सदरचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करता आली नाही. जलक्षेत्र क्र.ड/9 ते 15 पाण्याच्या टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पद्धतीने मजुर पुरविणे या कामाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम उपलब्ध नाही, त्यामुळे सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देणेकामी किमान 5-6 महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी विषयांकित काम पुढे चालु ठेवणे आवश्यक आहे. सदर कामाची निविदा रक्कम रु.48,81,528/- इतकी असून सदर काम चालु ठेवणेकरिता वाढीव खर्चाची आवश्यकता आहे. सदर कामासाठी सन 2017-18 च्या अंदाजपत्रकातील पान क्र.871, अनु.क्र.2 या नवीन कामाची निविदा प्रक्रीया या विभागामार्फत अद्याप अंतिम न झाल्याने कामाची आवश्यकता व महत्व लक्षात घेवून मे.समीप सर्व्हिसेस यांच्याकडून जुने काम पुढे चालु ठेवण्यात यावे. या विभागामार्फत नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत 5 महिने म्हणजेच दि.31/12/2017 पर्यंत मुदतवाढ मिळणेस व त्यासाठी येणा-या सुधारीत र.रु.97,70,025/- (सुधारित निविदा र.रु.65,13,350/- + 6.60% कमी दरानुसार व वाढीव र.रु.32,56,675/-) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – मा.सहशहर अभियंता श्री.दूधेकर यांनी मान्य केलेनुसार दि.३१/१०/२०१७ पर्यंत नविन कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन विषय मंजूर करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक –७३० विषय क्रमांक – १०
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/७९/२०१७ दि.२४/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलक्षेत्र क्र.१ ते ८ पाण्याच्या टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणेचे काम मे.शुभम उद्योग यांना देणेत आलेले आहेत. सदरचे काम निविदा दरापेक्षा 16.29% जादा दराने देणेत आलेले असून सदर कामाची मुळ मुदत 10 महिने होती. सन 2016-

17 चे अंदाजपत्रकामध्ये मजुर पुरविणेच्या नवीन कामास पुरेशी तरतूद नसल्यामुळे सदरचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करता आली नाही. जलक्षेत्र क्र.१ ते ८ पाण्याच्या टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पध्दतीने मजूर पुरविणे या कामाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम उपलब्ध नाही, त्यामुळे सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देणेकामी किमान 7-8 महिन्याचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी विषयांकित काम पुढे चालु ठेवणे आवश्यक आहे. सदर कामाची निविदा रक्कम रु.22,85,292/- इतकी असून सदर काम चालु ठेवणेकरिता वाढीव खर्चाची आवश्यकता आहे. सदर कामासाठी सन 2017-18 च्या अंदाजपत्रकातील पान क्र.869, अनु.क्र.12 या नवीन कामाची निविदा प्रक्रीया या विभागामार्फत अद्याप अंतिम न झाल्याने कामाची आवश्यकता व महत्व लक्षात घेवून मे.शुभम उद्योग यांच्याकडून जुने काम पुढे चालु ठेवण्यात यावे. या विभागामार्फत नवीन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत 6 महिने म्हणजेच दि.31/12/2017 पर्यंत मुदतवाढ मिळणेस व त्यासाठी येणा-या वाढीव र.रु.15,94,362/- सह सुधारित खर्च रक्कम रू.61,64,946/-मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – मा.सहशहर अभियंता श्री.दूधेकर यांनी मान्य केलेनुसार दि.३१/१०/२०१७ पर्यंत नविन कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

दि.३१/१०/२०१७ पर्यंत मुदतवाढ देऊन विषय मंजूर करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक –७३१ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था.उ/कावि/५६/२०१७ दि.२४/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.७ च-होली येथील वाघेश्वर मंदिर परिसरात उद्यान विकसित करणेकामी मनपा पॅनलवरील अनुभवी वास्तुविशारद मे.किमया आर्किटेक्ट पुणे यांची नेमणूक करणेस व या कामासाठी वास्तुविशारद यांना म.न.पा. चा आर्किटेक्ट पॅनल वरील फी स्ट्रक्चर मूळ मंजूर मा.स्थायी समिती ठराव क्र.११२६२ दि.०५/१०/२०१५ (Annexture-1) प्रमाणे फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३२ विषय क्रमांक – १२
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – कायदा
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कास/६/कावि/४५१/२०१७ दि.२५/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मोटार वाहन अपघात दावा क्रमांक ९२६/२००७ या प्रकरणी मा.मोटार अपघात न्यायाधिकरण पुणे, यांचेकडील आदेशान्वये वादी यांना दाव्याच्या खर्चाची रक्कम रु.१५,१६०/- सह मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई र.रु.२३,९५,०००/- दाव्याच्या तारखेपासुन (दिनांक ०१/०८/२००७ पासुन) प्रतिवर्षी र.रु.८.००% दराने व्याजासह अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३३ विषय क्रमांक – १३
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/१७१/२०१७ दि.२०/७/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.15/2016-17 मधील अ.क्र.8 अन्वये अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.२७ मोरवाडी परीसरातील स्ट्रिट लाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेकामी (सन २०१६-१७) मे.कमल इलेक्ट्रीकल एंटरप्रायजेस नि.र.रू.8,24,994/- (अक्षरी र.रू. आठ लाख चौवीस हजार नऊशे चौ-याण्णव फक्त) पेक्षा 24.26% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३४ विषय क्रमांक – १४
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/६१९/२०१७ दि.२७/७/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.9/2016-17 मधील अ.क्र.12 अन्वये ड क्षेत्रीय कार्यालय कक्षेतील पिंपरी उपविभागातील वार्ड क्र.४३ ते ४७ या परिसरात टी-५ व इतर फिटींगची दुरुस्ती करणेकामी मे.कमल इलेक्ट्रीक एंटरप्रयजेस नि.र.रू.8,99,190/- (अक्षरी र.रू.आठ लाख नव्यान्नव हजार एकशे नव्वद फक्त) पेक्षा 11.12% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३५ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५ब/कावि/३९४/२०१७ दि.२४/७/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय आरोग्य विभागातील कचरावाहतुक विभागामध्ये "वाहनासाठी टायर ट्युब खरेदी" कामी मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/३९४/१७ दि.२४/०७/२०१७ अन्वये र.रू.६२,१४८/-(अक्षरी र.रू.बासष्ठ हजार एकशे अठ्ठेचाळीस फक्त) आगाऊ रक्कम घेणेत आलेली होती. त्यापैकी र.रू.६२,१४८/- खर्च झाली असून जादा र.रू.२६५६/-(अक्षरी र.रू.दोन हजार सहाशे छपन्न फक्त) खर्च झाला असून र.रू.६४,८०४/-(अक्षरी र.रू.चौसष्ठ हजार आठशे चार फक्त) इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.सदरचे कचरा वाहतुक विभागातील एकूण १३ टाटा एसीई वाहना करीता नवीन टायर टयुब खरेदी करणेकामी प्रत्यक्ष झालेला खर्च र.रू.६४,८०४/- (अक्षरी र.रू.चौसष्ट हजार आठशे चार फक्त) समायोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३६ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१०७/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०३/०४/२०१७ ते दि.०९/०४/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१०७/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३७ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१०८/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१०/०४/२०१७ ते दि.१६/०४/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१०८/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३८ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१०९/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१७/०४/२०१७ ते दि.२३/०४/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१०९/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७३९ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११०/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२४/०४/२०१७ ते दि.३०/०४/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११०/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४० विषय क्रमांक – २०

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१११/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०१/०५/२०१७ ते दि.०७/०५/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१११/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४१ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११२/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०८/०५/२०१७ ते दि.१४/०५/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक

यांनी क्र.मुलेप/६/कावि/११२/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४२ विषय क्रमांक – २२
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११३/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१५/०५/२०१७ ते दि.२१/०५/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११३/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४३ विषय क्रमांक – २३
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११४/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२/०५/२०१७ ते दि.२८/०५/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११४/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४४ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११५/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२९/०५/२०१७ ते दि.०४/०६/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११५/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४५ विषय क्रमांक – २५
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११६/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०५/०६/२०१७ ते दि.११/०६/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११६/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४६ विषय क्रमांक – २६
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११७/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१२/०६/२०१७ ते दि.१८/०६/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११७/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४७ विषय क्रमांक – २७
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११८/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१९/०६/२०१७ ते दि.२५/०६/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/११८/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४८ विषय क्रमांक – २८
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/११९/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२६/०६/२०१७ ते दि.०२/०७/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक

यांनी क्र.मुलेप/६/कावि/११९/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७४९ विषय क्रमांक – २९

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१२०/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.०३/०७/२०१७ ते दि.०९/०७/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१२०/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७५० विषय क्रमांक – ३०

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मुख्यलेखापरिक्षण

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१२१/२०१७ दि.२५/०७/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१०/०७/२०१७ ते दि.१६/०७/२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१२१/२०१७ दि.२५.०७.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७५१ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.सहशहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/६/कावि/४२३/२०१७ दि.२१/०७/२०१७

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते ४) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरा नुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७५२ विषय क्रमांक – ३२
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/५६१/२०१७ दि.२८/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून -

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र. ENV 01 2017 18 मधील मोशी कचरा डेपो येथील मेकॅनिकल कंपोस्ट प्लॅन्ट व सॅनिटरी लॅन्डफिल प्रकल्पाचे ०५ वर्षे कालावधीकरिता चालन, देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.बी.व्ही.जी.(इं) लि. यांचेकडुन १) एस.एल.एफ. चालन, देखभाल व दुरुस्ती करणे र.रु.१६४/- (प्रति मे.टन) २)मेकॅनिकल कंपोस्ट प्लॅन्ट चालन,देखभाल व दुरुस्ती करणे र.रु.३८५/- (प्रति मे.टन) (निविदेमधील अटी व शर्ती Section-2 General Condition of Contract 41.5 & 42 नुसार वाढ/घट च्या अधिन राहुन) या दराने करुन घेऊन त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी प्रस्तुत कामाच्या निविदा अटी,शर्तीनुसार कॉन्ट्रॅक्ट पिरियड हा तीन वर्षांचा असून त्यापुढील कॉन्ट्रॅक्ट पिरियड उभयतांच्या संमतीने दोन वर्षे वाढवण्याची तरतुद आहे. हे पाहता तसेच कच-यापासुन उर्जा निर्मिती प्रकल्प प्रस्तावीत असल्याने सध्या तीन वर्ष कालावधीसाठी मान्यता देणेत येत आहे. तसेच त्यानंतर पुढील कालावधीसाठी मा.स्थायी समिती सभेची पुन्हा मंजुरी घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७५३ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/७/कावि/१४९/२०१७ दि.२८/०७/२०१७
विषय - सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षाकरिता माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ हा उपक्रम राबविणेकामी व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ३३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय-** मा.आवारी, प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ) यांनी घड्याळी तासाप्रमाणे रु.४५०/- हा जो दर लावलेला आहे, तो दर कमी करुन घेण्यात यावा. आपण तासिका दरानुसार कोणकोणत्या विषयासाठी, किती किती शिक्षक नेमले आहेत,याचा संपूर्ण तपशिल पुढील सभेत सादर करावा.

ठराव क्रमांक –७५४ | विषय क्रमांक – ३४
दिनांक – ०२/०८/२०१७ | विभाग – संगीत अकादमी
सूचक – मा.अनुराधा गोफणे | अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.संअ/१/कावि/४७/२०१७ दि.२८/०७/२०१७

विषय - पं.डॉ.नंदकिशोर कपोते, मानद सल्लागार यांना मुदतवाढ देणेबाबत...

विषय क्रमांक ३४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय- १)** पं.डॉ.नंदकिशोर कपोते यांना पंडीत ही पदवी शास्त्रीय नृत्यामध्ये मिळालेली आहे. ते शहराचे भूषण आहेत. तरीदेखील नृत्य, संगीत (शास्त्रीय/सुगम), गायन या प्रत्येक विषयाकरिता वेगवेगळी अकादमी स्थापन करुन त्या-त्या विषयातील तज्ञ व्यक्ती मानद सल्लागार म्हणून नेमण्यात यावेत.

**२)** जे नृत्य शिक्षक राज्यस्तरावर काम करतात, त्यांची वेगळी नृत्य अकादमी स्थापन करुन त्यावर पं.डॉ.नंदकिशोर कपोते यांची मानद सल्लागार म्हणून नेमणूक करणेत यावी. नृत्याकरीता श्रीमती गिता शर्मा, तेजश्री अडीगे, शास्त्रीय संगिताकरीता श्रीमती रेश्मी हरिषकुमार आणि शास्त्रीय गायन व वादन याकरीता पं.सुधाकर चव्हाण यांचीही नेमणूक करावी.

**३)** शहरात शास्त्रीय संगितातील तज्ञ अशी काही मंडळी आहेत, तसेच महापालिकेतील काही अधिका-यांनी देखील या क्षेत्रात काम केले आहे त्यांचा सल्ला घ्यावा. वर्तमानपत्रांत जाहीरात प्रसिद्ध करा.

**४)** सदर विषय दुरुस्तीसह फेरसादर करावा. तोपर्यंत विषय क्र.३४ तहकूब करणेत येत आहे.

----------

ठराव क्रमांक –७५५ | विषय क्रमांक – ३५
दिनांक – ०२/०८/२०१७ | विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.राजू मिसाळ | अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/४/कावि/४५०/२०१७ दि.२९/०७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे आरोग्य विभागास बॅक्टोडेक्स डिसईनफिक्टन्टेड खरेदीकामी ई-नि.क्र.७७/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले आहेत. त्यामध्ये प्राप्त निविदाकारा पैकी मे.सुहरिद केमिकल्स यांचे बॅक्टोडेक्स डिसईन फिक्टन्टेड चे सर्वात लघुत्तम दर र.रू.१३३५/- प्र.लि. प्राप्त झालेला आहे. प्राप्त लघुत्तम दराने आरोग्य विभागास एकूण ३००० लि. बॅक्टोडेक्स डिसईनफिक्टन्टेड खरेदी कामी एकूण र.रू ४०,०५,०००/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकूण र.रू ४०,५०,०००/- पेक्षा १.११% ने कमी आहेत. सदर दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असून त्यांचेबरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –७५६ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/९२६/२०१७ दि.२९/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवीन **ग व ह** प्रभाग कार्यालयांसाठी आवश्यक संगणक यंत्रणा (हार्डवेअर) खरेदी करणेकामी ऑनलाईन निविदा क्र.०६/०१/२०१७-१८ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे)प्रा.लि. यांचे बाब क्र.०१ साठी आवश्यक संगणक संच साहित्याचे दर एकुण र.रू.२४,८४,०००/- व मे.इंदू इन्फोटेक सोल्यूशन यांचे एकूण बाब क्र.२ व ३ साठी प्रिंटर व युपीएस साहित्याचे दर एकुण र.रू.८,९१,१५०/- असे एकत्रीत एकूण र.रु.३३,७५,१५०/- लघुत्तमदर प्राप्त झाले आहेत. मनपाचे नवीन **ग व ह** प्रभाग कार्यालयांसाठी आवश्यक संगणक यंत्रणा खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ९.१२% ने कमी असलेने त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक –७५७ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ०२/०८/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/०४/कावि/४४९/२०१७ दि.२९/७/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या नविन प्रभाग रचनेनुसार ग व ह क्षेत्रिय कार्यालयाकरीता आवश्यक फर्निचर साहित्य खरेदीकामी ई नि.सु.क्र.०७/२०१७-१८ अन्वये प्रसिद्ध करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील १. मे.निर्मिती इंजिनिअरींग कॉर्पोरेशन, यांचे बाब क्र. ०३ व ०४ एकुण ०२ बाबींसाठी र.रु.११,२२,४८०/- २.मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस, यांचे बाब क्र.०५ व ०६ एकुण ०२ बाबींसाठी र.रु.४,७३,०४०/- व ३. मे.स्वराज फर्निचर अँड इलेक्ट्रॉनिक्स मॉल, यांचे बाब क्र. ०१ व ०२ एकुण ०२ बाबींसाठी र.रु.४,१६,०००/- असे एकुण र.रु.२०,११,५२०/- (अक्षरी र.रु.वीस लाख अकरा हजार पाचशे वीस फक्त) खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७५८ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०२/०८/२०१७

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:-मा.अमित गावडे, मा.लक्ष्मण उंडे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे संभाजीनगर परिसरामध्ये शिव शाहू शंभो उद्यान विकसित केलेले असुन उद्यानाच्या व वृक्षारोपणाच्या कामकाजामध्ये स्थानिक संस्था, मंडळे इत्यादींचा सहभाग असणे आवश्यक आहे. या उद्देशाने शिव शाहू शंभो या उद्यानाच्या देखभाल, विकास व संरक्षणाचे कामकाज सदगुरु स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांना प्रायोगिक तत्वावर एक वर्ष कालावधीसाठी देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७५९ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०२/०८/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:-मा.हर्षल ढोरे, मा.मोरेश्वर भोंडवे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शाहू नगर परिसरामध्ये शाहू उद्यान विकसित केलेले असून उद्यानाच्या व वृक्षारोपणाच्या कामकाजामध्ये स्थानिक संस्था, मंडळे इत्यादींचा सहभाग असणे आवश्यक आहे. या उद्देशाने शाहू या उद्यानाच्या देखभाल, विकास व संरक्षणाचे कामकाज सदगुरु स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांना प्रायोगिक तत्वावर एक वर्ष कालावधीसाठी देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७६० विषय क्रमांक – ४०

दिनांक – ०२/०८/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:-मा.उषा मुंढे, मा.कोमल मेवानी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामधील क्रांतीवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणेसाठी वास्तुविशारद नेमणे या कामासाठी तरतुद करणेत आली असून सदरचे काम विशेष स्वरुपाचे असल्याने प्रकल्पाचे आराखडे व नियोजन करणेकामी मे.किमया आर्किटेक्ट (श्री.किरण कलमदाणी) यांची सदर कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता मनपाचे वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार पॅनेलवर नेमणूक करुन वास्तुविशारद सल्लागार (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या व यशस्वीपणे पूर्ण होणेकामी त्यांना त्याकरीता निविदापूर्व कामासाठी १.००% व निविदा पश्चात कामासाठी १.३५% (सर्व करांसहीत) फी अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७६१ विषय क्रमांक – ४१
दिनांक – ०२/०८/२०१७
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

क प्रभागामध्ये विविध विकासकामे (उदा.रस्ते,शाळा,क्रिडांगणे इ.) करणेसाठी आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट इ. नेमणे आवश्यक आहे. प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे प्रस्तावित कामे करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदापुर्व कार्यवाहीपर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची म.न.पा.पॅनेलवरील वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणे व त्यासाठी वरील यादीप्रमाणे वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना म.न.पा. मान्य दराने प्रस्तावात नमूद १ ते १६ पर्यंतच्या कामांसाठी (भाग-१) कामाच्या निविदा रकमेच्या र.रु.५० लाखापर्यंत ३% + सेवाकर व ५० लाखाच्या पुढे २% + सेवाकर, तसेच पी.एम.सी. (प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार) (निविदा पश्चात कामासाठी) निविदा रकमेच्या १.३५% + सेवाकर, रस्तेविषयक प्रस्तावात नमूद कामांसाठी १ ते ८ (भाग-२) निविदा रकमेच्या एकूण फी २.२५% + सेवाकर (निविदा पूर्व = ०.८०% + सेवाकर) व निविदानंतरचे कामासाठी १.४५% + सेवाकर याप्रमाणे सर्व करांसह फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७६२ विषय क्रमांक – ४२
दिनांक – ०२/०८/२०१७
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.माधुरी कुलकर्णी, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

प्रस्तावात नमूदप्रमाणे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये समावेश नसलेली परंतु अंदाजपत्रकामध्ये समावेश करुन प्रशासकीय रक्कमेस मान्यता घेवून व त्याचप्रमाणे तरतूद करुन निविदा काढणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | कामाची निविदा काढणेसाठी सन २०१७-१८ साठी आवश्यक तरतूद | मनपा पॅनलवरील वास्तुविशारदाचे नाव | वास्तुविशारद फी, अनुज्ञेय फी | प्रकल्प सल्लागार फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | किवळे येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे. | ५,००,००,००० | १,००,००,००० | मे.शिल्पी आर्किटेक्टस् पुणे | २%सर्व्हिस टॅक्स | --- |
| २. | रावेत येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे. | ३,००,००,००० | ७५,००,००० | मे.सोनाली दुदगीकर असोसिएटस् | २%सर्व्हिस टॅक्स | --- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | बोपखेल येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे. | ४,००,००,००० | १,००,००,००० | मे.सृजन प्लॅनिंग & रिसर्च फाऊंडेशन, पुणे | २%सर्व्हिस टॅक्स | --- |
| ४. | दापोडी आ.क्र.३/१ येथे उद्यान विकसित करणे. | १,५०,००,००० | १,००,००,००० | मे.सोनाली दुदगीकर असोसिएटस् | २%सर्व्हिस टॅक्स | --- |
| ५. | वाकड येथे मनपाच्या आरक्षित जागेत उद्यान विकसित करणे. | ३,००,००,००० | १,००,००,००० | मे.किमया आर्किटेक्टस् पुणे | २%सर्व्हिस टॅक्स | --- |
| | **एकूण =** | **१६,५०,००,०००** | **४,७५,००,०००** | | | |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७६३ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०२/०८/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भः- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव...

महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता आर्किटेक्ट, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अंदाजपत्रकातील प्रस्तावित कामे करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदापुर्व कार्यवाहीपर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची म.न.पा.पॅनेलवरील वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणे व त्यासाठी प्रस्तावात नमूद यादीप्रमाणे वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना म.न.पा. मान्य दराने प्रस्तावात नमूद १ ते १५ पर्यंतच्या कामांसाठी (भाग-१) कामाच्या निविदा रकमेच्या र.रु.५० लाखापर्यंत ३% + सेवाकर व ५० लाखाच्या पुढे २% + सेवाकर, तसेच पी.एम.सी. (प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार) (निविदा पश्चात कामासाठी) (निविदा पश्चात कामासाठी) निविदा रकमेच्या १.३५% + सेवाकर, रस्तेविषयक कामांसाठी प्रस्तावात नमूद १ ते ८ (भाग-२) निविदा रकमेच्या एकूण फी २.२५% + सेवाकर (निविदा पूर्व = ०.८०% + सेवाकर) व निविदानंतरचे कामासाठी १.४५% + सेवाकर याप्रमाणे सर्वकरांसह फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –७६४ विषय क्रमांक – ४४

दिनांक – ०२/०८/२०१७

सूचक – मा.वैशाली काळभोर अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भः- मा.वैशाली काळभोर, मा.निर्मला कुटे यांचा प्रस्ताव...

दि.०९/०८/२०१७ रोजी महापालिकेच्या प्रभाग समिती अध्यक्ष पदांच्या निवडणुका मा.स्थायी समिती सभागृहात होणार असल्यामुळे बुधवार दि.०९/०८/२०१७ रोजी होणारी मा.स्थायी समितीची सभा ही गुरुवार दि.१०/०८/२०१७ रोजी दु.२.०० वा. घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/५९/२०१७
दिनांक - ११/०८/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.